नि.२१ खाली आदेश

१. सदर वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-६, नियम-१७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेकामी दाखल केलेला आहे.

२. वादीने दाखल केलेल्या अर्जाचे व प्रतिवादींनी दिलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच दोन्ही पक्षांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

३. वादीचे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, वादींना त्यांचे घरातुन बाहेर जाण्यासाठी सि.टी स.नं ५९२ मधुन जावे लागते. त्यामुळे सदर मिळकत चतुःसिमासह दाव्याचे कामी सामील करणे जरुरीचे आहे. तसेच प्रतिवादीने कैफियतमध्ये सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत नमुद केले असुन दाव्याचे कामी सदर मिळकत सामील केल्याशिवाय त्याबददल मागणी करता येणार नाही. सदर दुरुस्ती तांत्रीक स्वरुपाची असल्याने सदर दुरुस्ती मंजुर करण्यात यावी. याउलट प्रतिवादीचे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादीने कैफियतमध्ये बचाव घेतल्यानंतर वादीने सदरचा दुरुस्ती अर्ज दिलेला आहे. प्रतिवादीने सदर मिळकतीबाबत बचाव घेतल्यामुळे प्रतिवादीचे लाभामध्ये कायदेशीर हक्क निर्माण झालेला आहे. त्यामुळे वादी सदर दुरुस्ती करुन प्रतिवादीचा हक्क बाधीत करु शकत नाही. तसेच वादी सदर दुरुस्ती करुन दाव्याचे स्वरुप बदलु पाहत आहे. वादीने माहिती असताना देखील सदर मिळकत दावा दाखल करतेवेळी दाव्यात सामाविष्ट केलेली नाही. त्यामुळे सदर अर्ज नामंजुर करण्यात यावा. सदर युक्तीवादाच्या पुष्ठयर्थ प्रतिवादींचे विधिज्ञांनी मा.मुंबई उच्च न्यायालय यांचे खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला.

**1. Jayshree Subhash Kalbande V/s Bhaurao Nagorao Derekar 2014(4)Mh.L.J 168.**

**2. Hanumandas Vallabhdas and sons V/s Pitambar Bhatu Choudhari deceased since his LR's Sarubai Pitambar Choudhari and others 2007 (4) Mh.L.J 721.**

**3. Anil Vishanath Jadhav V/s Pankaj Indrajeet Bassi 2010 (2) Mh.L.J 220.**

**4. Vaishnavi Sai Shri Mahalaxmi Jagdamba Shikshan Sanstha, Nagpur V/s Purv Vidarbh Mahila Parishad Nagpur, 2022 (1) Mh.L.J 519.**

**5. Rajashri @ Rajani and others V/s Smt. Mariya Elsa De Noronha Wolfango Da Silva. 2010(4) A.I.R Bom. R 406.**

४. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला. दाखल न्यायनिर्णयांचे काळजीपुर्वक अवलोकन केले. उपरोक्त नमुद न्यायनिर्णय जयश्री काळबांडे व हनुमानदास यामध्ये वादीचे तत्परता याबाबत नमुद केलेले आहे. या ठिकाणी हे ध्यानात घेणे जरुरीचे की, सद्य स्थितीला प्रस्तुत प्रकरणामध्ये अदयाप मुददे काढलेले नाहीत. तसेच सदर दाव्यामध्ये सुनावणी चालु झालेली नाही. त्यामुळे वादी कोणत्याही टप्यावर वादकथनांमध्ये दुरुस्ती करु शकतो.

५. तसेच प्रतिवादीचे कथन असे की, वादी मागणी करत असलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपामध्ये बदल होत आहे. उपरोक्त नमुद न्यायनिर्णय वैष्णवी संस्था व राजश्री या मध्ये दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपामध्ये बदल होत असेल अथवा नवीन वादकारण निर्माण होत असेल तर अशी दुरुस्ती मंजुर करता येणार नाही असे कथन केलेले आहे. या ठिकाणी हे नमुद करणे जरुरीचे की, वादीने दाव्याचे कलम १ मध्ये सदर बोळ मिळकत दक्षिणेकडील सि.स.नं ५९२ च्या हददीकडे जात असुन त्यानंतर सि.स नं ५९२ मधुन पुर्वेकडे सि.सनं ५९४ व ५९७ चे दक्षिणेकडील हददीवरुन सि.स.नं ५९७ चे पुर्वेकडील हददीपर्यंत जाउन तेथुन पुढे दक्षिणेकडुन सि.स नं ५९२ मधुन सि.स.नं ५९२ चे दक्षिणेकडे असणारे रस्त्यापर्यंत सदर बोळ मिळकतीचा सि.स.नं ५९३ आहे असे नमुद केले आहे. तसेच वादीने बोळ मिळकत वादीचे घरातुन मुख्य रस्त्यावर जाणेकरिता ताबेवहिवाटीचा ४ फुट रुंद व अंदाजे ८१ फुट लांबीचा रस्ता व सि.स नं ५९८ चे दक्षिणेकडील रस्त्यापर्यंतची सि.स नं ५९२ मधील मोकळी जागा हा दाव्याचा विषय आहे असे नमुद केले आहे. सदर वाद मिळकतीचे वर्णन पाहता सि.स. नं ५९२ हि मिळकत देखील दाव्याचा विषय आहे. सदर दुरुस्तीने वादी सि.स नं ५९२ या मिळकतीच्या चतुःसिमा दाव्यामध्ये सामाविष्ट

करण्याची मागणी करत आहे. सदर मागणी मंजुर केली असता, वादमिळकतीचे ओळख स्पष्ट होईल. सदर दुरुस्तीमुळे दावा गुणदोषावर चालणेस सहाय्य होईल.

६. प्रतिवादीचे म्हणणे असे की, सदर मिळकतीबाबत प्रतिवादींनी कैफियतमध्ये बचाव घेतला असल्याने प्रतिवादीस कायदेशीर हक्क प्राप्त झालेला आहे व सदर दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादीच्या हक्कास बाध निर्माण होत आहे. सदर कथनांच्या पुष्ठयर्थ प्रतिवादींनी उपरोक्त नमुद न्यायनिर्णय हनुमानदास याचा आधार घेतला. सदर न्यायनिर्णयाचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता, सदर न्यायनिर्णयातील परिस्थिती व या दाव्यातील परिस्थिती भिन्न आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये सुनावणी प्रारंभ झालेली होती. परंतु या प्रकरणामध्ये अदयाप मुददे काढण्यात आलेले नाहीत. त्यामुळे मी आदरपुर्वक नमुद करु इच्छीते की, सदर न्यायनिर्णयातील आदेश प्रस्तुत प्रकरणी लागु होत नाही. प्रतिवादीने कैफियतमध्ये वादीने दाव्यामध्ये सि.स. नं ५९२ हि मिळकत दावा मिळकत म्हणुन नमुद केली नाही असा बचाव घेतलेला आहे. परंतु या ठिकाणी नमुद करणे जरुरीचे की, उपरोक्त चर्चिलेप्रमाणे वादीने दाव्याचे परिच्छेद क्रं १ मध्ये सि.स.नं ५९२ मधील मोकळी जागा दाव्याचा विषय असल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे सदर मिळकत वाद मिळकत म्हणुन दाव्यामध्ये सामील आहे. त्यामुळे प्रतिवादीच्या लाभात त्यासंदर्भात हक्क प्राप्त झालेला आहे असे म्हणता येणार नाही. म्हणुन सदर दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादीच्या हक्कास बाध निर्माण होणार नाही.

७. या ठिकाणी हे नमूद करणे गरजेचे आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-६, नियम-१७ नुसार न्यायालय दाव्याच्या कोणत्याही टप्प्यावर दाव्यातील पक्षकारांना त्यांची वाद कथने दुरुस्त करण्याची परवानगी देऊ शकते. प्रस्तुत दुरुस्ती ही मिळकतीचे वर्णन स्पष्ट करण्याकरिता जरुरीची आहे. अशा परिस्थितीमध्ये वादीस दुरुस्ती करण्यास परवानगी देणे उचित होईल. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-६, नियम-१७ नुसार दाखल केलेला आहे. या ठिकाणी हे ध्यानात घेणे गरजेचे आहे की, वादीने मागणी केलेली दुरुस्ती मंजूर केली नाही, तर विनाकारण इतर कार्यवाही वाढण्याची शक्यता आहे. तसेच वादीचे नुकसान होण्याची शक्यता आहे. याउलट प्रतिवादीचे कोणतेही नुकसान

होणार नाही. तसेच प्रतिवादीस सदर दुरुस्त दाव्यास कैफियत देण्याचा अधिकार आहे. त्यामुळे सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे हितास बाध निर्माण होणार नाही. तसेच प्रस्तुत दुरुस्ती ही दाव्याचा न्यायनिवाडा करणेसाठी जरुरीची आहे. निश्चितच सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींची गैरसोय होणार आहे त्याची भरपाई वादीवर वादखर्च लादुन करता येईल. म्हणून वरील सर्वबाबी व कारणमिमांसा, आणि न्यायाचे उद्दीष्ट ध्यानात घेता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात आला:

## आदेश

१. अर्ज (नि.२१) खर्चासह मंजूर करण्यात आला.

२. वादी यांना प्रस्तुतच्या दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते व वादी यांनी विहीत कालावधीमध्ये दाव्याची दुरुस्ती प्रत न्यायालयामध्ये दाखल करावी. तत्पुर्वी वादीने प्रतिवादीस रक्कम रु.३००/- वादखर्च दयावा.

(ह.उ.उ.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश, भोर
जि.पुणे

दिनांक : २३/०३/२०२३

## Certificate

**“I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order.**
**Name of the Steno : V.G.Fulari**
**Court Name : H.U.U. Patil**
**Jt. C.J.J.D., Bhor, Dist. Pune.**
**Date : 23/03/2023**
**Order signed by presiding officer on : 24/03/2023**
**Order uploaded on : 24/03/2023.**